ePaper
वर्ष - 9 । अंक - 180 UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 25 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## "मम्मी, लँडिंगनंतर फोन करतो", घरी आला मृत्यूचा ईमेल





पान 2 वरुन...

ओतूरमध्ये दिवसाढवळ्या बिबट्याचा संचार

### केरळच्या नामांतराला केंद्राची हिरवी झेंडी; कायदा विभागाकडून मंजुरी

# देवभूमीचे नाव बदलण्यात येणार; केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्र सरकारने 'केरळ' राज्याचे नाव 'केरळम' करण्याच्या प्रस्तावाला प्राथमिक मंजुरी दिली असून संविधानिक प्रक्रियेतील पुढील टप्प्यांसाठी विधेयक राज्य विधानसभेकडे पाठविण्यात येणार आहे. संसद व राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर अंतिम निर्णय लागू होणार आहे.**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातील निर्णयाची माहिती दिली. विधेयक 2026 हे संविधानाचे कलम 3 नुसार केरळ राज्य विधानसभेला राज्याचं नाव बदलण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. त्याबाबत केरळ राज्य विधानसभेकडून प्रतिसाद आल्यानंतर भारत सरकार पुढील कार्यवाही करेल. 'केरळ' चे नाव बदलून 'केरळम' करण्यासाठी संसदेत विधेयक 2026 सादर करण्यासाठी राष्ट्रपतींकडून शिफारस घेतली जाईल.

## कायदा विभागाकडून मंजुरी

केंद्रीय गृहमंत्रालयानं 'केरळ' चे नाव 'केरळम' करण्याबाबत विचार केला. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंजूरी दिली. केरळ राज्याचं नाव बदलण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळानं कच्चा मसुदा तयार करण्यात आला. त्यानंतर कायदा आणि न्याय मंत्रालयाकडून टिप्पणी नोंदवण्यात आली. कायदा आणि न्याय मंत्रालयाच्या कायदा विभागाकडून केरळ राज्याचं नाव बदलण्यासाठी मंजुरी देण्यात आली.






## घटनेच्या कलमानुसार राज्याचं नाव बदलण्याची आहे तरतूद...

केरळ विधानसभेनं 24 जून 2024 रोजी 'केरळ' चे नाव बदलून 'केरळम' करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. केरळचे नाव मल्याळम भाषेनुसार 'केरळम' आहे, असे केरळ राज्य विधानसभेनं म्हटलं होतं. भाषेच्या आधारानुसार 1 नोव्हेंबर 1956 मध्ये केरळ राज्य अस्तित्वात आलं आहे. भारतीय स्वातंत्र्ययुद्धानंतर मल्याळम भाषिकांनी संयुक्त केरळ राज्य स्थापन करण्याची जोरदार मागणी केली होती. केरळ विधानसभेनं एकमतानं केंद्र सरकारला संविधानातील कलम 3 नुसार नाव बदलण्याचा प्रस्ताव पाठविला होता. तसेच घटना अस्तित्वात होण्यापूर्वीच्या शेड्यूलमध्ये बदल करण्यासाठी पावले उचलण्याची केरळ सरकारनं मागणी केली आहे. घटनेच्या कलम 3 नुसार राज्यांची नावे बदलण्याची तरतूद अस्तित्वात आहे.

# मुळा-मुठा नदी जलपर्णींच्या विळख्यात; दौंड-हवेलीतील गावांवर आरोग्याचा धोका

## हिरवेगार पाणी दिसत असले तरी संकट गंभीर; कायमस्वरूपी उपायांची गरज

**महाईन्यूज । राहू**

**दौंड व हवेली तालुक्यांतील अनेक गावांसाठी वरदान ठरलेली मुळा-मुठा नदी सध्या जलपर्णींच्या विळख्यात सापडली आहे. अल्पावधीतच बेसुमार वाढणाऱ्या जलपर्णीमुळे नदीपात्र हिरव्या चादरीने झाकल्यासारखे दिसत असून नागरिक तसेच जनावरांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही गंभीर समस्या बनली आहे. दरवर्षी उद्भवणारी ही समस्या आता कायमस्वरूपी स्वरूप धारण करत असल्याने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे.**



> मुळा-मुठा नदीवरील जलपर्णीमुळे नागरिक व जनावरांच्या आरोग्यास निर्माण झालेल्या धोक्याबाबत मागील काही अधिवेशनांत प्रश्न उपस्थित केले आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.
>
> **- राहुल कुल, आमदार, दौंड**

दरवर्षीप्रमाणे दिवाळीनंतर पाणी साठवण्यासाठी नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावर ढापे टाकून पाणी अडवले जाते. पाणी साठवण्यास सुरुवात होताच नदीत जलपर्णीची झपाट्याने वाढ सुरू होते. काही दिवसांतच पाण्यावर घट्ट थर निर्माण होतो. या थरावरून मच्छीमार जीव धोक्यात घालून मासेमारी करताना दिसतात, तर काही जनावरे जलपर्णी खाण्यासाठी थेट नदीपात्रात उतरतात.

सध्या नदीच्या पाण्यावर जणू हिरवेगार मैदान तयार झाल्याचा भास होत आहे. मात्र, काही दिवसांनी ही जलपर्णी कुजते आणि परिसरात डासांची मोठ्या प्रमाणावर उत्पत्ती होते. गतवर्षी देलवडी, वाळकी, पिंपळगाव, राहू, दहिटणे, मिरवडी, खामगाव, नांदूर आदी गावांत डासांच्या प्रादुर्भावामुळे काही जनावरे मृत्युमुखी पडली होती. दुधाच्या उत्पादनातही लक्षणीय घट झाल्याची माहिती दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दिली. डासांच्या वाढत्या संख्येमुळे ग्रामस्थांच्या आरोग्यावरही परिणाम झाला होता.

> जलपर्णी सडल्यानंतर डासांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होते. नदीकाठच्या गावांत डासांचा फैलाव झाल्यास विविध आजारांचा धोका वाढतो. परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय यंत्रणा सज्ज आहे.
>
> **- डॉ. पूजा कोकरे, वैद्यकीय अधिकारी, राहू आरोग्य केंद्र**

दरवर्षी हीच परिस्थिती उद्भवत असल्याने वाढत्या जलपर्णीवर वेळीच नियंत्रण मिळवून तिचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी दहिटणे, मिरवडी, पिंपळगाव, राहू, वाळकी, देलवडी, पारगाव, खामगाव या नदीकाठच्या गावांतील ग्रामस्थ व शेतकरी वर्गातून होत आहे.

# ओतूरमध्ये दिवसाढवळ्या बिबट्याचा संचार; शेतकरी भयभीत

**महाईन्यूज । ओतूर**

**ओतूर (ता.जुन्नर) हद्दीतील गाढवे पटात बिबट्याचा दिवसा संचार होत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये यांनी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संदीप बबन गाढवे यांच्या शेतातील गहू व कांद्याच्या पिकामध्ये बिबट्या मुक्तपणे फिरताना अनेकांना दिसल्याची घटना मंगळवारी (दि.२४) सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान घडली असून दीपक गाढवे या शेतकऱ्याने याबाबत माहिती दिली आहे.**



मंगळवारी सकाळच्या सुमारास शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना अचानक बिबट्या दिसून आला. काही शेतकऱ्यांनी प्रसंगावधान राखत सुरक्षित अंतरावरून मोबाईलमध्ये त्याचा व्हिडिओ चित्रित केला. हा व्हिडिओ परिसरात वेगाने व्हायरल होत असून ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाढवे पट भागात दाट लोकवस्ती आहे,आता बिबट्या दिवसाही वस्तीच्या जवळ दिसत असल्याने शेतकरी शेतात जाण्यास घाबरत आहेत. विशेषतः लहान मुले व जनावरांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

परिसरात दाट उस, गहू व कांद्याची शेती असल्याने वन्यप्राण्यांना लपण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याचे स्थानिकांचे मत आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन परिसरात पाहणी करावी, पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे तसेच ग्रामस्थांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी एकटे शेतात न जाणे, लहान मुलांना बाहेर सोडू नये व रात्रीच्या वेळी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

### नागरिकांसाठी सतर्कतेचा इशारा

बिबट्याच्या संचारामुळे ग्रामस्थांनी अनावश्यक गर्दी करू नये व व्हिडिओ काढण्यासाठी जवळ जाण्याचा प्रयत्न टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतात काम करताना समूहाने जावे, लहान मुलांना एकटे बाहेर सोडू नये तसेच सायंकाळनंतर जनावरे सुरक्षित गोठ्यात बांधावीत, असा सल्ला वनविभागाने दिला आहे. बिबट्या दिसल्यास तत्काळ वनविभाग किंवा स्थानिक प्रशासनाला कळवावे, स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

# कामकाजातील हलगर्जीपणा व आर्थिक गैरव्यवहार आरोप; 12 अहवाल आयुक्तांकडे, कारवाईला विलंब

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत 38 अधिकारी-कर्मचाऱ्यांवर खातेनिहाय चौकशी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कामकाजात हलगर्जीपणा, विनापरवाना गैरहजर, तसेच आर्थिक गैरव्यवहारात सहभाग आणि थेट लाच मागणे यांसारख्या गंभीर आरोपांमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील एकूण 38 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मागे खातेनिहाय चौकशीचा ससेमिरा लागला आहे. त्यापैकी सद्यस्थितीत 30 जणांची चौकशी सुरू असून, आणखी आठ जणांवर सामान्य प्रशासनाने खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केली आहे; मात्र अनेक प्रकरणात निकालाअभावी संबधितांविरुध्द कारवाईला विलंब होत आहे.**




महापालिकेच्या आस्थापनेवर 7 हजार 500 कर्मचारी कार्यरत आहेत. या मोठ्या यंत्रणेत नियमभंग करणाऱ्यांवर कठोर व तात्काळ कारवाई अपेक्षित आहे. त्यासाठी प्रथमदर्शनी चूक आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केली जाते. महापालिकेकडून चालणारी खातेनिहाय चौकशीची प्रक्रिया संथपणे सुरू असल्याचे वारंवार दिसते. आताच्या घडीला महापालिका आस्थापनेवरील 30 अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे. त्यापैकी 12 जणांवर दोषारोप निश्चित झाले आहेत. त्यांच्यावर कारवाईसाठी प्रस्ताव आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत. तर इतरांची चौकशी सुरू असून, आणखी आठ जणांची खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केली आहे.

तक्रारीनंतर प्राथमिक तपास व चौकशी अहवालानुसार आयुक्तांकडून खातेनिहाय चौकशीचे आदेश दिले जातात. आरोपपत्र तयार करून संबंधित कर्मचाऱ्यास लेखी आरोपांची माहिती दिली जाते. कर्मचाऱ्यांकडून त्याचे स्पष्टीकरण घेतले जाते. साक्ष व पुरावे तपासले जातात. समितीकडून चौकशी अहवाल अर्थात निकाल आल्यानंतर आयुक्तांकडून निलंबन, वेतनवाढ रोखणे, पदावनती, बडतर्फी किंवा निर्दोष मुक्तता अशा प्रकारची कारवाई केली जाते; मात्र चौकशी सुरू असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांची प्रकरणे मागील दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे चौकशी सुरू असूनही अनेक कर्मचारी सेवेत कायम राहतात, बदली होतात किंवा निवृत्तीच्या उंबरठ्यावर पोहोचतात. त्यामुळे दोषी ठरले तरी शिक्षा होत नाही. ही संपूर्ण प्रक्रिया लवकर पूर्ण करून दोषींवर ठोस कारवाई होणे आवश्यक आहे. गंभीर आरोपांमध्ये केवळ निलंबन पुरेसे नसून चौकशी पूर्ण होण्यास विलंब झाला, तर पुरावे कमकुवत होण्याचा धोका असतो. परिणामी दोषी सुटण्याची शक्यता वाढते. त्याचा विपरित परिणाम प्रामाणिक कर्मचाऱ्यांवर होतो. कामचुकारपणा करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई न झाल्यास प्रशासनातील शिस्त ढासळते. नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास कमी होतो. चौकशीचा निकाल आणि कारवाईला होणारा विलंब पाहता चौकशीचा फक्त फार्स प्रशासकीय यंत्रणेकडून केला जातो का, असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जातो.

### १२ कर्मचाऱ्यांचे अहवाल आयुक्तांकडे

सद्यस्थितीत 30 अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्यापैकी ज्या 12 कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशीचे अहवाल प्राप्त झाले. त्यांचे अहवाल कारवाईसाठी आयुक्तांकडे पाठविण्यात आले आहेत. तर, निवडणूक काळात निर्णय झालेले नाहीत. प्राप्त अहवालानुसार लवकरच संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे महापालिकेचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.

# चोराला रंगेहाथ पकडला अन् धु... धु... धुतला!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी परिसरात एका धाडसी घटनेत स्थानिक रहिवाशांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता एका सराईत घरफोड्याला रंगेहाथ पकडले आहे. पकडलेला आरोपी जालना येथील असून, त्याचा दुसरा साथीदार मात्र पिस्तूलाचा धाक दाखवून पळून जाण्यात यशस्वी झाला आहे.**



भोसरी (पिंपरी चिंचवड) येथे जालना येथील सराईत गुन्हेगार सागर सिंग सुरत सिंग उर्फ फंटास्टिक बावरी अंधरेले (वय 27 रा - गुरुगोविंदसिंगनगर जालना) याने व त्याच्या सोबतच्या अज्ञात आरोपीने राहत्या घरी फ्लॅटची कडी काढून व लॅच कशाच्यातरी सहाय्याने तोडून आत प्रवेश केला. बेडरूममधील लोखंडी कपाटाचे ड्रॉवर व लाकडी कपाटातील लॉकर कशाच्या तरी सहाय्याने उचकटून रोख रक्कम व चांदीची नाणी, असे घरफोडी करून चोरी करून पुन्हा मोटारसायकलची चोरी करून मोटारसायकलवरून पसार झाला. मोटारसायकल वरून पळून जात असताना मोठे साहस दाखवत तेथील रहिवासी सचिन पिंगळे, चेतन वारुळे, ताज शेख, उमेश वाल्हे, सुधीर वाघ, जोतीराम भोसले, गोपाळ कुलकर्णी, बिल्डिंगचे सिक्युरिटी यांचे नातेवाईक नामे ध्वजशेर शाही व इतर इसम यांनी सागर सिंग याला पकडले. पण दुसरा आरोपी हा पिस्तूलाचा धाक दाखवून पळून गेला. सदर झटापटीत ध्वजशेर शाही हे हाताच्या बोटाला चाकू लागून जखमी झाले आहेत. सदर बाबत भोसरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून पोलीस पथक तपास करत आहे.

### नागरिकांची शौर्यपूर्ण कृती

घरफोडी करून मोटारसायकलवरून पळून जाणाऱ्या आरोपीचा स्थानिकांनी पाठलाग करून मोठ्या धाडसाने त्याला पकडले. झटापटीदरम्यान एका नागरिकाच्या हाताला चाकू लागून दुखापत झाली. पकडलेला आरोपी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असून फरार साथीदाराचा शोध सुरू आहे. नागरिकांच्या तत्परतेमुळे मोठा गुन्हा उघडकीस आला असून परिसरात त्यांच्या धाडसाचे कौतुक होत आहे.



## भूमिका

**भारतासह अनेक देशांवर आयातशुल्क लागू करण्याचा अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, ही अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानी कारभाराला दिलेली चपराक आहे. आपत्कालीन कायद्याचा आधार घेऊन अनेक देशांवर आयातशुल्क लागू करण्याचा सपाटा ट्रम्प यांनी लावला होता; या निर्णयाने त्याला वेसण घातली.**

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानीला वेसण



सन १९७७च्या 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट'चा वापर ट्रम्प यांनी त्यासाठी केला होता. मात्र, अध्यक्षांना तसा अधिकार नसल्याचा निर्णय न्यायालयाने सहा विरुद्ध तीन अशा बहुमताने दिला. यामुळे अहंकार दुखावलेले ट्रम्प हा निर्णय सहजी स्वीकारणार नसल्याचेच त्यांच्या भूमिकेवरून दिसते. त्यांनी नव्याने १५ टक्के अतिरिक्त व्यापारशुल्क लागू केलेच; त्यासह काँग्रेसची मान्यता मिळवून, अथवा अन्य वेगवेगळ्या कायद्यांचा आधार घेऊन ते सध्याची शुल्करचनाही कायम ठेवण्याचा प्रयत्न करतील. हे असले, तरी विविध देशांना अनिश्चिततेच्या गर्तेत लोटून गेले वर्षभर साऱ्या जगाला वेठीस धरणारे ट्रम्प यांचे लेखणीच्या एका फटकाऱ्याद्वारे उपसले जाणारे आयातशुल्काचे हत्यार न्यायालयाच्या या निर्णयाने बोथट झाले, हे निर्विवाद. अंतिम टप्प्यावर असलेल्या भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारावर या निर्णयाचे काय परिणाम होणार आणि बदललेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन भारत नव्याने वाटाघाटी करणार का, ही आता उत्सुकतेची बाब आहे.

जागतिक व्यापार आणि धोरणात्मक संबंध या खरे तर गंभीरपणे हाताळण्याच्या बाबी; पण मुळातच लहरी कारभारासाठी प्रसिद्ध असलेले ट्रम्प यांच्या हाती आलेल्या आयातशुल्कनामक हत्याराचा गेले वर्षभर त्यांनी खेळण्यासारखाच वापर केला. कधी द्विपक्षीय व्यापारातील अनुशेष भरून काढण्याच्या निमित्ताने, तर कधी रशियन तेलाची खरेदी करतो आणि युद्धाला मदत करतो, असा ओरडा करून त्यांनी भारतावरही एकूण ५० टक्के आयातशुल्क लादले होते. आयातशुल्काद्वारे दबावतंत्र वापरून आपल्या अटी त्यांनी अनेक देशांच्या गळी उतरवल्या. चीनसारख्या देशांनी फणा उगारल्यानंतर त्यांनी माघारही घेतली. आणीबाणीच्या प्रसंगी वापरले जाणारे आर्थिक अधिकार शांतताकाळात वापरता येणार नाहीत, हा मूळ भारतीय अमेरिकी नागरिक नील कत्याल यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. या निर्णयानंतरही आपला हेका सोडणार नसल्याचे ट्रम्प यांनी न्यायमूर्तींवरच टीका करून दाखवून दिले आहे. त्यांनी लागू केलेल्या १५ टक्के अतिरिक्त शुल्काचीही मुदत सहा महिन्यांचीच आहे. आता पूर्वी लागू केलेल्या शुल्कविषयक तरतुदींना मान्यता घेण्यासाठी त्यांना काँग्रेसपुढे जावे लागेल. मात्र, खुद्द रिपब्लिकन पक्षातही आयातशुल्काला अनेकांचा विरोध आहे. या मंथनातून नेमके काय समोर येणार, याविषयी संभ्रम आहे; तसेच 'बेकायदा' वसूल केलेल्या सुमारे १३३ अब्ज डॉलरच्या शुल्काचा परतावा देण्याबाबत न्यायालयाने काही भाष्य केलेले नाही. कायद्यानुसार आजवर काँग्रेसने मान्य केलेले आयातशुल्क आणि दहा टक्के इतके अतिरिक्त शुल्क सध्या तरी लागू असल्याचे 'व्हाइट हाउस'च्या प्रवक्त्यांचे म्हणणे ट्रम्प हे जोवर नवा अगोचरपणा करीत नाहीत, तोवर सत्य मानावे लागेल, असे दिसते. भारताविरोधातही ट्रम्प यांनी आयातशुल्काचा मनमुराद वापर केला. भारत-अमेरिका व्यापारकरारातील तरतुदींबाबत, विशेषत: भारतीय मालावर १८ टक्के आणि अमेरिकी मालावर शून्य टक्के आयातशुल्काबाबत ट्रम्प यांनी केलेले भाष्य पाहता, हा करार अमेरिकेच्या फायद्याचा आणि एकतर्फी असल्याची टीका विरोधकांकडून सुरू आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतरही 'भारत-अमेरिका करार कायम आहे. अमेरिका शुल्क देणार नाही आणि भारत देणार आहे,' या ट्रम्प यांच्या विधानाने त्यात भरच पडणार आहे. मात्र, एपस्टिन फाइलवरून होणारी टीका, गाझा शांतता मंडळावरून मतमतांतरे आणि इराणवर हल्ल्यांची तयारी अशा परिस्थितीत न्यायालयाच्या निर्णयाने कातावलेले आडमुठे ट्रम्प पोतडीतून नवे कोणते अस्त्र बाहेर काढणार, याचाही विचार करावा लागेल.

## प्रासंगिक »

### लोभ

***एक भिकारी होता. तो रोज गावात लोकांना भीक मागायचा. मिळेल ते खायचा. काही मिळाले नाही, तर पाणी पिऊन जगायचा.***

त्याला कोणीतरी सांगितले की 'तू गावाबाहेर नदीकाठी इंद्राची पूजा कर. तो प्रसन्न होईल आणि तुला श्रीमंत करेल'. तो त्याप्रमाणे करतो. इंद्र प्रसन्न होतो. इंद्र त्याला म्हणतो, की 'तू तुझी झोळी पुढे कर. मी त्यात पैसे टाकत जाईत. तू जेव्हा थांब म्हणशील, तेव्हा मी थांबेन. मात्र, हे लक्षात ठेव, जर तुझी झोळी फाटली व पैसे खाली पडले तर त्यांची माती होईल. त्या माणसालाही पैशांची हाव सुटते. तो सुध्दा गावाबाहेर जातो. इंद्राला प्रसन्न करतो. इंद्र त्याच्या झोळीत पैसे टाकायला सुरवात करतो. तो आणखी मागत राहतो. शेवटी पैशाच्या हव्यासापायी थांब म्हणायचे विसरतो. त्यामुळे त्याच्या झोळीवर त्या पैशांचा ताण पडतो आणि ती फाटते. सर्व पैसे खाली पडतात व त्यांची माती होते. त्याचबरोबर इंद्रही नाहीसा होतो.

-तात्पर्य: कोणत्याही गोष्टीचा लोभ नसावा

तब्बल अकराहून अधिक राज्यांमध्ये पसरलेली आणि सहा दशकांहून अधिक काळ देशांतर्गत सुरक्षेसमोर आव्हान उभी करणारी नक्षलवादी चळवळ आता शेवटच्या टप्प्यात पोहोचल्याचे चित्र दिसत आहे.

# नक्षलवादी चळवळीच्या शेवटच्या घटका



प्रखर राजकीय इच्छाशक्ती आणि सातत्यपूर्ण कारवाई यामुळे कठीण वाटणारे उद्दिष्ट साध्य होऊ शकते, याचे हे ठोस उदाहरण मानावे लागेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ३१ मार्च २०२६ ही कालमर्यादा जाहीर करत नक्षलवाद निर्मूलनाचा निर्धार व्यक्त केला होता. अंतिम मुदत जवळ येत असतानाच अनेक प्रमुख नक्षल नेत्यांनी शस्त्रत्याग केल्याने या मोहिमेला निर्णायक वळण मिळाले आहे. तेलंगणा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र अशा राज्यांतील अनेक कुख्यात नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. हजारो कार्यकर्त्यांनीही मुख्य प्रवाहात परतण्याचा मार्ग स्वीकारला. सुरक्षादलांच्या कठोर कारवायांबरोबरच स्थानिक आदिवासी समाजातील कमी होत चाललेला पाठिंबा हेही या घडामोडीमागील महत्त्वाचे कारण ठरले. न्यायाच्या नावाखाली शस्त्रे उचलणाऱ्या या चळवळीनेच अनेक निरपराध आदिवासींचे जीव घेतले, विकासकामांना अडथळे आणले आणि भीतीचे वातावरण निर्माण केले. २००० नंतरच्या काळात नक्षलवादी हिंसाचारात सुमारे बारा हजारांहून अधिक जणांचा मृत्यू झाला. यात नक्षलवादी, सुरक्षा रक्षक आणि सामान्य नागरिक यांचा समावेश आहे. महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, बिहार, ओडिशा यांसारख्या राज्यांमध्ये विकासप्रक्रिया ठप्प झाली होती. पोलिस बंदोबस्त आणि सुरक्षाव्यवस्थेसाठी हजारो कोटींचा खर्च झाला. हा निधी विकासासाठी वापरता आला असता, ही खंतही व्यक्त होते. नोकरशाही, वनखात्याचे अधिकारी आता तरी काही बोध घेतील का? 'शस्त्रे टाकली असली तरी विचार संपलेला नाही,' असे शरण आलेल्या एका नेत्याने म्हटलेच आहे. त्याची गंभीर दखल राजकीय नेतृत्वाने आणि प्रशासनाने घ्यायला हवी.

तथापि, केवळ शस्त्रसंपवणूक म्हणजे सर्व समस्या संपल्या असे नाही. शरणागतांचे प्रभावी पुनर्वसन, आदिवासींचे जल-जंगल-जमीनवरील हक्क अबाधित ठेवणे आणि संतुलित विकास साधणे ही पुढील मोठी आव्हाने आहेत. दुर्मीळ खनिजसंपत्तीने समृद्ध असलेल्या या भागात विकासाच्या नावाखाली स्थानिकांच्या हक्कांवर गदा येऊ नये, याची दक्षता घ्यावी लागेल. कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठीची कारवाई परिस्थिती नियंत्रणात आणते; मात्र दीर्घकालीन समाधानासाठी संवाद, शिक्षण, रोजगारनिर्मिती आणि पारदर्शक प्रशासन आवश्यक आहे. नक्षलवाद्यांची शरणागती हा दिलासादायक अर्धविराम आहे; आता समतोल आणि लोकाभिमुख विकासातूनच या संघर्षाला पूर्णविराम देता येईल.

## ।। अभंगवाणी ।।



अंगीकार ज्याचा केला नारायणें ।
निंद्य तें हि तेणें वंद्य केलें ॥१॥

अजामेळ भिल्ली तारीली कुंटणी ।
प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बहुचर्चीत हुमगाव- बावधन रस्त्याची दर्जोन्नती

## मंत्री शिवेंद्रसिंहराजेंनी दिली मंजूरी; दोन तालुके जोडून दळणवळण सुकर

**महाईन्यूज । कुडाळ**

**सातारा जिल्ह्यातील जावली आणि वाई तालुक्यातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम आणि सुरक्षित करण्याच्या दृष्टीने आखाडे- हुमगाव- वाघजाईवाडी- झगडेवस्ती- बावधन बगाड या महत्त्वाच्या मार्गाची दर्जोन्नती करून त्याला प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे जावली तसेच वाई तालुक्याच्या ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सुकर, सुलभ आणि सुरक्षित होण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**



पुणे सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांच्या प्रस्तावानुसार तसेच सातारा जिल्हा परिषदेच्या ठरावानुसार सदर मार्गाच्या दर्जोन्नतीचा सविस्तर विचार करून या रस्त्याची दर्जोन्नती करण्यात आली आहे. या मार्गावरील वाढती वाहतूक, परिसरातील गावांची संख्या आणि लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने हा महत्त्वपूर्ण निर्णय सोमवारी घेतला. शासन निर्णयानुसार आखाडे-हुमगाव-वाघजाईवाडी-झगडेवस्ती-बावधन बगाड रस्त्याला प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक 181 असा क्रमांक देण्यात आला आहे. या मार्गाची एकूण लांबी 12.800 कि.मी. असून जावळी आणि वाई तालुक्यातील अनेक गावांना या मार्गामुळे थेट लाभ मिळणार आहे या ग्रामीण रस्त्याला आता प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा मिळाल्यामुळे या रस्त्याच्या दुरुस्ती, मजबुतीकरण आणि विस्ताराच्या कामांना गती मिळणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून येथील शेतीमाल वाहतूक, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास तसेच दैनंदिन दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. रस्त्याच्या विकासासाठी आवश्यक असलेली जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावावर असल्याची खात्री करूनच पुढील विकासकामे करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.ग्रामीण भागातील रस्ते मजबूत करण्याच्यादृष्टीने शासनाने घेतलेला हा निर्णय स्थानिक नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा मिळाल्यामुळे या परिसरातील विकासाला चालना मिळेल, तसेच जावली-वाई परिसरातील दुर्गम वस्त्यांचा संपर्क अधिक सुलभ होणार आहे. ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था सुधारल्यास पर्यटनालाही चालना मिळेल, अशी अपेक्षा स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### ग्रामीण भागाच्या विकासाला बळ

प्रमुख जिल्हा मार्गांच्या लांबीत वाढ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निर्णयानुसार या दर्जोन्नतीमुळे सातारा जिल्ह्यातील प्रमुख जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्गांची एकूण लांबी 4050.745 कि.मी. इतकी झाली आहे. ग्रामीण मार्गांची लांबी 64.80.135 कि.मी. इतकी राहणार आहे. आखाडे-हुमगाव-वाघजाईवाडी-झगडेवस्ती -बावधन बगाड या मार्गाला प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा मिळाल्यामुळे जावली व वाई तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला नवे बळ मिळेल. या मार्गाच्या दर्जोन्नतीमुळे नगारिकांना सुरक्षित व सुलभ वाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील रस्ते मजबूत करणे आणि दुर्गम भागांना मुख्य प्रवाहाशी जोडणे हे शासनाचे प्राधान्य आहे. या मार्गाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दर्जेदार कामे करण्यात येतील. या निर्णयामुळे स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी व विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.

# डिजिटल अरेस्ट हा निव्वळ खोटेपणा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**महाईन्यूज । मुंबई**

**डिजिटल अरेस्टविरोधात केंद्र सरकार आणि राज्य सरकार मोठ्या प्रमाणात जनजागृती करत आहेत. रिंगटोनवरही जाहिराती आहेत. तरीही रोज प्रत्येक दिवशी फसवणूक होत आहे. डिजिटल अरेस्ट हा निव्वळ खोटेपणा आहे. कोणालाही फोन आला तर थेट १९३० वर तक्रार करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्राचे अर्थसंकल्पी अधिवेशन सुरू आहे. विधानसभेत डिजिटल अरेस्टबाबत समाजवादी पक्षाचे सदस्य आमदार अबू आझमी यांनी प्रश्न उपस्थित केला होता.**




देशात डिजिटल अरेस्ट घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. मोठ्या प्रमाणात लोक याला बळी पडत आहेत. त्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक होत आहे. या घटना टाळण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली पाहिजेत, जनजागृतीची व्याप्ती वाढवली पाहिजे, असे सांगत अबू आझमी यांनी याकडे लक्ष वेधले. अबू आझमी यांच्या प्रश्नाला गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिले. परंतु, यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सविस्तर भूमिका मांडली.

दरम्यान, असा फोन आला तर थेट त्याच क्षणी १९३० या नंबरवर कॉल करा. हा सायबरचा नंबर आहे. मोठी व्यवस्था उभी आहे. तुम्हाला असा फोन आला किंवा तुमचे यात पैसे गेले तर सुरुवातीच्या पहिल्या तासांत म्हणजेच गोल्डन अवर १९३० क्रमांकावर तक्रार नोंदवली तर तुमचे पैसे रिकव्हर केले जातील, असे फडणवीस यांनी सांगितले.

### डिजिटल अरेस्ट १०० टक्के फ्रॉड

राज्यमंत्र्यांनी योग्य उत्तर दिले आहे. या सभागृहातील चर्चा राज्यभरात जाते, म्हणून या माध्यमातून या सभागृहातील सदस्यांना तसेच राज्यातील नागरिकांना सांगतो की, डिजिटल अरेस्ट असा प्रकारच नाही. कायद्याने कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. त्यामुळे कोणी डिजिटल अरेस्टचा फोन केला किंवा व्हिडिओ कॉल केला तर पहिल्याच क्षणी समजून घ्यावे की, हा फ्रॉड आहे. १०० टक्के हा फ्रॉड आहे. कोणत्याही कायद्यान्वये कोणीही कोणाला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### पूर्ण ऑपरेशन विदेशातून होते

एक फोन येतो, त्यावर समोर बसलेला माणूस स्वतःला पोलीस अधिकारी सांगतो. मग तो म्हणतो की, तुम्ही पार्सल मागवले का? त्यात ड्रग्स सापडले आहेत. तुम्हाला जागचे हलण्याचीही परवानगी दिली जात नाही. तुम्हाला स्क्रीनपुढेच राहायला सांगितले जाते. त्यातून सुटण्याकरिता पैसे पाठवण्याची मागणी केली जाते. मग सामान्य माणूस घाबरून पैसे ट्रान्स्फर करतो. डिजिटल अरेस्ट प्रकरणात फक्त सामान्य माणूस नाहीतर अनेक मोठे अधिकारीही अडकले जातात. पीडितांनी पैसे पाठवल्यावर ते पैसे वेगवेगळ्या खात्यांमध्ये तत्काळ विदेशातील खात्यात पाठवले जातात. अनेक प्रकरणात असे लक्षात आले आहे की, पूर्ण ऑपरेशन विदेशातून होते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# 'आरएसएस'ची प्रतिनिधी सभा १३ मार्चपासून

## मोदी सरकारच्या काळातील राष्ट्रीय परिस्थितीवर चिंतन

महाईन्यूज । नवी दिल्ली

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) अखिल भारतीय प्रतिनिधी सभा या वर्षी १३, १४ आणि १५ मार्च २०२६ रोजी हरियाणातील समलखा येथे आयोजित केली जात आहे. संघाच्या दृष्टिकोनातून, ही बैठक सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. ही वार्षिक बैठक यावर्षी ग्राम विकास आणि सेवा साधना केंद्र, पट्टी कल्याण, समलखा, हरियाणा येथे आयोजित केली जात आहे.**



या वर्षी संघाचे शताब्दी वर्ष असल्याने, या बैठकीत विजयादशमी उत्सव, घरगुती संपर्क, हिंदू परिषदा, युवा परिषदा, प्रमुख नागरिक बैठका आणि सामाजिक सलोखा बैठका यासारख्या शताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रम आणि मोहिमांमधील अनुभव आणि अहवालांवर विशेषतः चर्चा केली जाईल. प्रतिनिधी सभा गेल्या वर्षातील, २०२५-२६ च्या संघाच्या कार्याचा आढावा घेईल आणि प्रांतांमध्ये हाती घेतलेले विशेष कार्य सादर करेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) वार्षिक अखिल भारतीय प्रतिनिधी सभा मागील वर्षी १५, १६ आणि १७ मार्च २०२४ रोजी विदर्भातील नागपूर येथील रेशीमबाग येथील स्मृती भवन कॅम्पसमध्ये झाली होती. या बैठकीत २०२३-२४ साठी संघाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला होता. ही बैठक दर तीन वर्षांनी नागपूरमध्ये होत असून यामध्ये संघातील पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. तर दरवर्षी विविध भागात ही बैठक होते. यंदा हरीयाणामध्ये बैठक होणार आहे. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे आणि सर्व सह-सरकार्यवाह आणि इतर पदाधिकारी तसेच कार्यकारी सदस्य बैठकीला उपस्थित राहतील. बैठकीत प्रामुख्याने निवडून आलेले प्रतिनिधी, राज्य आणि प्रदेश पातळीवरील प्रमुख पदाधिकारी असे एकूण १४८९ कार्यकर्ते उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. ३२ संघ प्रेरित संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, सरचिटणीस आणि संघटन मंत्री देखील बैठकीत उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

### बैठकीत काय काय होणार?

या बैठकीत सध्याच्या राष्ट्रीय परिस्थितीवर चर्चा होईल आणि काही महत्त्वाच्या विषयांवर ठराव मंजूर होतील. संघ शाखांकडून सामाजिक बदलासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांवर, विशेषतः पंच परिवर्तन प्रयत्नांवर चर्चा अपेक्षित आहे. संघ शिक्षा वर्ग आणि कार्यकर्ता विकास वर्गासह इतर प्रशिक्षण वर्गांच्या योजनांवर चर्चा केली जाईल आणि येत्या वर्षासाठी संघाच्या कार्य योजनेचा निर्णय घेतला जाईल.

# स्पाईसजेटच्या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग; मोठा अनर्थ टळला

महाईन्यूज । नवी दिल्ली

**दिल्लीहून लेहला जाणाऱ्या स्पाईसजेटच्या विमानानं दिल्ली विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग केलं आहे. स्पाईसजेटच्या (बोईंग ७३७) विमानात तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे लेहला जाण्याऐवजी विमान दिल्ली विमानतळावर उतरवण्यात आलं. विमानात १५० प्रवासी होते. सुदैवानं कोणतीही जीवितहानी झालेली नाही.**




एएनआय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानाचं दुसरं इंजिन फेल झाल्यानं इमर्जन्सी लँडिंग करावं लागलं. विमानात तांत्रिक समस्या निर्माण झाल्याची माहिती पायलटनं हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला तातडीनं दिली. त्यानंतर विमान पुन्हा एकदा दिल्लीला नेण्याचा निर्णय घेण्यात आला. एटीसीच्या परवानगीनंतर विमानतळावर सुरक्षित लँडिंग करण्यात आलं. त्यामुळे प्रवाशांनी सुटकेचा निश्वास टाकला. स्पाईसजेटच्या विमानानं लेहला जाण्यासाठी उड्डाण केलं होतं. पण काही मिनिटांतच विमान माघारी परतलं. विमानात ठिणगी आणि आग दिसू लागल्यानं प्रवासी घाबरले. विमानात एकूण १५० प्रवासी होते. इंजिनात बिघाड झाल्याची माहिती पायलटनं एटीसीला दिली. पायलटनं मेडे कॉल दिला. त्यामुळे विमान तातडीनं दिल्ली विमानतळाकडे वळवण्यात आलं. लेहला निघालेल्या विमानानं उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांत परतीचा प्रवास सुरु केला. विमान हवेत असताना ठिणगी आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. त्यामुळे विमान तातडीनं उतरवण्यात आलं. यासाठी विमानतळावर आणीबाणी घोषित करण्यात आली होती. सुदैवानं दुर्घटना टळली. विमानातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत. दिल्लीला जाणारं विमान तांत्रिक बिघाडामुळे दिल्लीला परतल्याचं एअरलाईन कंपनीच्या प्रवक्त्यांनी सांगितलं. 'विमान दिल्लीत सुरक्षित उतरवण्यात आलं. सगळे प्रवासीदेखील सुरक्षित आहेत,' अशी माहिती प्रवक्त्यांनी दिली. विमानाच्या दुसऱ्या इंजिनात बिघाड झाल्यानं आपत्कालीन लँडिंग करण्यात आलं.

SG 121 दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन निघालं होतं. विमानाच्या एका इंजिनात बिघाड असल्याचं कर्मचाऱ्यांच्या लक्षात आलं. त्यांना सतर्कतेचा उपाय म्हणून विमान पुन्हा दिल्लीला नेण्याचा निर्णय घेतला. विमानतळावर वैद्यकीय सेवा आणि अग्निशमन सुविधा तैनात ठेवण्यात आली. विमानतळावर आणीबाणी घोषित करण्यात आली. या विमानात जवळपास १५० प्रवासी होते. याबद्दल स्पाईसजेटनं अद्याप तरी कोणतंही अधिकृत निवेदन जारी केलेलं नाही.

# आधी ब्रेकअप आणि आता ड्रीम होम



अभिनेत्री तारा सुतारिया माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा नातू वीर पहाडिया याच्यासोबत रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा काही काळापासून रंगल्या होत्या. दोघे अनेकदा एकत्र दिसल्यामुळे त्यांच्या नात्याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र काही दिवसांपूर्वीच त्यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या आणि त्यांचे ब्रेकअप झाल्याच्या चर्चा सुरू झाल्या. या बातम्यांमुळे सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटताना दिसल्या. एकीकडे तिच्या ब्रेकअपच्या चर्चा सुरू असतानाच आता तिने चाहत्यांना आनंदाची आणि अभिमानाची बातमी दिली आहे. ताराने तिचे पहिले घर विकत घेतले असून तिच्या आयुष्यातील हा एक महत्वाचा टप्पा मानला जात आहे.तिच्या नव्या घराची सजावट सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. घराच्या प्रत्येक कोपऱ्यात तिने अत्यंत आवडीने आणि बारकाईने सजावट केली आहे. सुंदर, सुगंधी फुलांनी आणि आकर्षक कॅण्डल्सने तिने घर सजवले असून त्यामुळे संपूर्ण घर अधिक उबदार, प्रसन्न आणि आकर्षक वाटत आहे. घरातील वातावरण शांत आणि सकारात्मक जाणवते. ताराच्या या नव्या घरासाठी चाहत्यांसोबतच अनेक सेलिब्रिटींनीही सोशल मीडियावरून तिला शुभेच्छा दिल्या आहेत आणि तिच्या नव्या प्रवासासाठी मंगलकामना व्यक्त केल्या आहेत.तारा सुतारियाने 23 फेब्रुवारी 2026 रोजी इन्स्टाग्रामवर तिच्या नव्या घराची पहिली झलक चाहत्यांसोबत शेअर केली. तिने काही सुंदर फोटो आणि व्हिडीओ पोस्ट करत आपल्या आनंदाची भावना व्यक्त केली. हे फोटो आणि व्हिडीओ पाहून चाहते प्रचंड आनंदी झाले असून त्यांनी कमेंट्स आणि लाईक्सच्या माध्यमातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. या झलकांमध्ये ताराचे घर अतिशय सुंदर, प्रशस्त आणि शांत दिसत आहे. अभिनेत्रीने घराच्या एका कोपऱ्यात पियानोही ठेवला असून तिला पियानो वाजवायला खूप आवडते, हे तिने अनेकदा सांगितले आहे. त्यामुळे तिच्या घरात संगीताचीही एक खास झलक पाहायला मिळते. वर्क फ्रंटबाबत बोलायचे झाले तर, तारा लवकरच 'TOXIC' या बहुचर्चित चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात तिच्यासोबत यश, कियारा आडवाणी, नयनतारा आणि हुमा कुरेशी महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून ताराच्या भूमिकेबद्दलही चाहत्यांना विशेष उत्साह आहे.

# हिम्मतवाला'पासून श्रीदेवी सुपरस्टारपर्यंत...



भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिली महिला सुपरस्टार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीदेवी यांनी आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. हिंदीसह तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड अशा विविध भाषांतील सुमारे २०० चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले. 'हिम्मतवाला' या चित्रपटानंतर त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीत मोठी लोकप्रियता मिळाली आणि त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही.१३ ऑगस्ट १९६३ रोजी तामिळनाडूतील मीनमपट्टी येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील अय्यपन हे वकील होते, तर आई राजेश्वरी गृहिणी होत्या. अवघ्या सहा वर्षांच्या वयात त्यांनी चित्रपटांत बालकलाकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीत त्यांनी लहानपणीच आपली वेगळी ओळख निर्माण केली. १९७१ साली आलेल्या 'पूंबट्टा' या मल्याळम चित्रपटासाठी त्यांना केरळ राज्य पुरस्कार मिळाला. लहान वयातच अभिनय ही भावना व्यक्त करण्याची कला आहे, भाषा अडथळा नाही, हे त्यांनी ओळखले होते. १९७९ मध्ये 'सोलवां सावन' या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूडमध्ये प्रवेश केला.

# MBA करून झळकली अभिनेत्री!

एका अभिनेत्रीला अभिनयाची आवडही नव्हती आणि तिला इंडस्ट्रीत यायचं नव्हतं. पण ती अभिनेत्री झाली. १० वर्षांत तिने काही चित्रपट केले आणि इंडस्ट्री सोडली. मात्र या इंडस्ट्रीत काम करताना जे अनुभव तिला आले, त्याचा फायदा होईल असंच करिअर तिने पुढे निवडलं. विशेष म्हणजे आता कॉर्पोरेट क्षेत्रात मोठ्या पदावर काम करतेय.दीक्षा सेठचा अभिनेत्री होण्याचा कोणताही विचार नव्हता. तिचे वडील कॉर्पोरेट क्षेत्रात होते. त्यांच्या बदल्यांमुळे दीक्षाचे बालपण चेन्नई, मुंबई, कोलकाता, काठमांडू, राजस्थान आणि गुजरात अशा अनेक ठिकाणी गेले. सतत शाळा बदलत राहिल्यामुळे तिला कोणत्याही एका ठिकाणी स्थिरावण्याची सवय नव्हती. मुंबईत कॉलेजमध्ये असताना तिने 'मरीन आर्किओलॉजी' (सागरी पुरातत्वशास्त्र) शिकायचं ठरवलं होतं. समुद्राच्या तळाशी असलेले अवशेष आणि बुडालेल्या जहाजांचा इतिहास शोधणे, हे दीक्षा सेठचे ध्येय होतेदीक्षा कॉलेजच्या पहिल्या वर्षात असताना एका 'एनएसएस' (NSS) कार्यक्रमादरम्यान एका स्काऊटने तिला पाहिलं. त्याने तिला 'फेमिना मिस इंडिया' स्पर्धेत भाग घेण्यास सांगितलं. दीक्षा त्या स्पर्धेत सहभागी झाली आणि ती टॉप १० स्पर्धकांमध्ये पोहोचली. तिने 'फ्रेश फेस' हा किताबही जिंकला. दीक्षा हैदराबादमध्ये एका मॉडेलिंगच्या कामासाठी गेली होती. तिथे दिग्दर्शक क्रिशने तिला पाहिलं. त्यावेळी तो आगामी चित्रपटासाठी एक अभिनेत्री शोधत होता. तो चित्रपट होता 'वेदम'. या भूमिकेसाठी तब्बल ७० मुलींचे ऑडिशन झाले होते, पण शेवटी दीक्षाची निवड झाली. 'वेदम' या गाजलेल्या चित्रपटात तिने अल्लू अर्जुनची गर्लफ्रेंड पूजाची भूमिका साकारली होती. हा चित्रपट समीक्षकांना खूप आवडला होता. दीक्षाला या भूमिकेसाठी त्या वर्षीचा 'संतोषम फिल्म अवॉर्ड्स'चा 'बेस्ट न्यू फेस' पुरस्कार मिळाला होता. 'वेदम'च्या यशानंतर दीक्षाला एकामागून एक अनेक चित्रपट मिळाले. २०११ मधील मिरपाकय या सिनेमात दीक्षाने रवी तेजाबरोबर काम केलं होतं. त्याचवर्षी तिने वॉन्टेड सिनेमात काम केलं. हा चित्रपटही खूप गाजला होता. २०१२ मध्ये ती अनेक मोठ्या चित्रपटांत झळकली.




# भारत-पाकिस्तान सामना १४ जूनला

## एजबॅस्टनवर रंगणार भारत-पाक महामुकाबला; महिला टी-२० वर्ल्डकपमध्ये लढत

**महाईन्यूज | मुंबई**

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने ( ICC ) १२ संघांचा समावेश असलेल्या महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेचे वेळापत्रक आज जाहीर केले. यजमान इंग्लंड विरुद्ध श्रीलंका यांच्या लढतीने १२ जूनला या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेचे १० वे पर्व १२ जून ते ५ जुलै या कालावधीत १२ संघांच्या समावेशात पार पडणार आहे. या वर्ल्ड कप स्पर्धेची पात्रता निश्चित करणारे बांगलादेश, आयर्लंड, स्कॉटलंड व नेदरलँड्स हे अंतिम चार संघ ठरले आहे.**



पात्रता फेरीतून यशस्वीरीत्या पुढे आलेले बांगलादेश, आयर्लंड, स्कॉटलंड आणि नेदरलँड्स हे चार संघ आता मुख्य फेरीत दाखल होत क्रिकेटमधील दिग्गज संघांच्या रांगेत उभे ठाकले आहेत. गतविजेता न्यूझीलंड, २००९ मधील पहिल्या आवृत्तीचे यजमान आणि विजेते इंग्लंड, २०१६ सालचे विजेते वेस्ट इंडिज, एकदिवसीय विश्वचषक विजेता भारत तसेच तब्बल सहा वेळा ही स्पर्धा जिंकणारा बलाढ्य ऑस्ट्रेलिया या ताकदवान संघांमध्ये या चार पात्रता संघांची भर पडल्याने स्पर्धेची रंगत अधिकच वाढली आहे. नवोदित आणि अनुभवी संघांचा हा संगम यंदाच्या स्पर्धेला विशेष वैशिष्ट्य प्राप्त करून देणार आहे.

स्पर्धेतील अ गटात ऑस्ट्रेलिया, भारत, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश आणि नेदरलँड्स या संघांचा समावेश करण्यात आला आहे. या गटात जागतिक दर्जाचे खेळाडू आणि परंपरागत प्रतिस्पर्धी संघ असल्यामुळे प्रत्येक सामना अत्यंत चुरशीचा आणि थरारक होण्याची शक्यता आहे. विशेषतः भारत, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामने क्रिकेटप्रेमींसाठी मोठी पर्वणी ठरणार आहेत. पाकिस्तानचा संघही आश्चर्याचा धक्का देण्यास सक्षम मानला जातो, तर बांगलादेश आणि नेदरलँड्स हे संघही मोठ्या संघांविरुद्ध दमदार कामगिरी करण्यासाठी उत्सुक असतील.

दरम्यान, ब गटात यजमान इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका, वेस्ट इंडिज, आयर्लंड आणि स्कॉटलंड या संघांचा समावेश आहे. यजमान इंग्लंडला घरच्या मैदानाचा फायदा मिळण्याची शक्यता असली तरी न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज हे दोन्ही संघ मोठ्या स्पर्धांमध्ये प्रभावी कामगिरीसाठी ओळखले जातात. श्रीलंका संघालाही उलटफेर करण्याची क्षमता आहे, तर आयर्लंड आणि स्कॉटलंड हे संघ संधी मिळाल्यास मोठ्या संघांना धक्का देऊ शकतात. त्यामुळे दोन्ही गटांमध्ये उपांत्य फेरीसाठीची चुरस शेवटपर्यंत कायम राहण्याची चिन्हे आहेत.

स्पर्धेचा अंतिम सामना ऐतिहासिक आणि अत्यंत प्रतिष्ठित लॉर्ड्स मैदानावर ५ जुलै रोजी पार पडणार असून त्या अंतिम लढतीकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागलेले असेल. लॉर्ड्सच्या मैदानावर विश्वविजेत्याचा किताब उंचावण्याचे स्वप्न प्रत्येक संघ पाहत आहे.यंदाच्या स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेत असलेला सामना म्हणजे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील महामुकाबला होय. हे दोन्ही पारंपरिक आणि कट्टर प्रतिस्पर्धी संघ एकाच गटात असल्याने त्यांच्या लढतीची उत्सुकता आधीपासूनच शिगेला पोहोचली आहे.

१४ जून रोजी एजबॅस्टन येथे होणारा हा बहुप्रतिक्षित सामना केवळ दोन संघांमधील सामना नसून तो प्रतिष्ठेचा आणि अभिमानाचा प्रश्न मानला जातो. या सामन्याकडे जगभरातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले असून स्टेडियमसह दूरचित्रवाणी आणि डिजिटल माध्यमांवरही मोठी प्रेक्षकसंख्या अपेक्षित आहे.

### आयसीसी महिला टी २० विश्वचषक २०२६ वेळापत्रक

- रविवार १४ जून: भारत विरुद्ध पाकिस्तान, एजबॅस्टन
- बुधवार १७ जून: भारत विरुद्ध नेदरलँड्स, हेडिंग्ली
- रविवार २१ जून: दक्षिण आफ्रिका विरुद्ध भारत, ओल्ड ट्रॅफर्ड
- गुरुवार २५ जून: भारत विरुद्ध बांगलादेश, ओल्ड ट्रॅफर्ड
- रविवार २८ जून: ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत, लॉर्ड्स

# झिम्बाब्वेविरूद्धच्या सामन्यात संजू सॅमसनला संधी मिळणार?

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**भारतीय संघाने आयसीसी टी-२० वर्ल्ड २०२६ स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यांमध्ये दमदार कामगिरी केली. पण सुपर ८ फेरीत भारतीय संघाला हवी तसी कामगिरी करता आलेली नाही. पहिल्याच सामन्यात भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेकडून दारूण पराभवाचा सामना करावा लागला आहे. या स्पर्धेत संघातील प्रमुख फलंदाज तिलक वर्मा, अभिषेक शर्मा फ्लॉप ठरले आहेत. त्यामुळे संजू सॅमसनला खेळवण्याची मागणी वाढू लागली आहे.**





भारतीय संघातील टॉप ३ फलंदाजांमध्ये डावखुऱ्या हाताचे फलंदाज आहेत. त्यामुळे या फलंदाजांविरूद्ध गोलंदाजी करण्यासाठी ऑफ स्पिनरला गोलंदाजी आक्रमणाला लावलं जात आहे. ऑफ स्पिनरचा सामना करताना भारतीय फलंदाज अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे अभिषेक शर्मासोबत डावाची सुरूवात करण्यासाठी संजूला स्थान देण्याची मागणी केली जात आहे. तर आऊट ऑफ फॉर्म तिलक वर्माला संघाबाहेर करण्याची मागणी केली जात आहे. त्याच्या जागी इशान किशनला तिसऱ्या क्रमांकावर खेळवण्याची मागणी केली जात आहे. दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाला ७६ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यातील पराभवानंतर स्टार स्पोर्ट्सवरील एका कार्यक्रमात बोलताना इरफान पठाण म्हणाला,अभिषेक शर्माला बाहेर करण्याचा विचार केला जाऊ शकत नाही. पण तिलक वर्माच्या स्थानाबाबत नक्कीच विचार केला जाऊ शकतो. तिलकच्या जागी संजू सॅमसनला संधी दिली जाऊ शकते. सुरूवातीलाच डावखुऱ्या हाताचे फलंदाज असणं, हे विरोधी संघातील खेळाडूंसाठी प्लॅनिंग करण्याचं काम आणखी सोपं करत आहे.

तसेच भारतीय संघाचा माजी खेळाडू आकाश चोप्रा अक्षर पटेलला संघाबाहेर करण्याच्या निर्णयावर नाराज आहे. आकाश चोप्रा म्हणाला की, "अक्षर पटेलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्याने अनेकदा भारतीय संघाला अडचणीतून बाहेर काढलं आहे. असं असताना अक्षरला बाहेर करून सुंदरला संघात स्थान देणं, हा निर्णय मला योग्य वाटला नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार।
दि. 25 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# सांगवीत आजपासून 'पवनाथडी' जत्रेचा जल्लोष

## २५ फेब्रुवारी ते १ मार्चला रंगणार सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने महिला बचत गटांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'पवनाथडी' जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या जत्रेचे उद्घाटन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.**




### कार्यक्रमाची रूपरेषा

- २५ फेब्रुवारी – 'महाराष्ट्राची मराठी बाणा'
- २६ फेब्रुवारी – सुप्रसिद्ध होम मिनिस्टर कार्यक्रम
- २७ फेब्रुवारी – ऑर्केस्ट्रा म्युझिकल स्टार्स,
- २८ फेब्रुवारी – 'फोक संस्कृती'
- १ मार्च – द फोक लावणी'

महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर आयोजित या उपक्रमात नागरिकांना खरेदीसोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी अनुभवता येणार आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्वतंत्र स्टॉल्स येथे उभारण्यात आले असून, या माध्यमातून महिला उद्योजकतेला चालना मिळणार आहे. यासोबतच स्थानिक उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. या उपक्रमात महिला बचत गटांनी निर्मित केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ आणि पारंपरिक हस्तकलेचे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याशिवाय खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच नगरसदस्य,नगरसदस्या आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे , शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत.

# बनावट भरती प्रक्रियेपासून सावधान; पिंपरी चिंचवड महापालिकेचे आवाहन

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सध्या कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया सुरू नसल्याची स्पष्ट माहिती प्रशासन विभागाने दिली आहे. अलीकडे समाजमाध्यमांवर महानगरपालिकेत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असल्याचे भासवणारी खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. तसेच महापालिकेच्या नावाने बनावट नियुक्तीपत्रे, उमेदवारांची यादी देखील प्रसिद्ध केली जात आहे. परंतु महानगरपालिकेकडून भरती प्रक्रियेबाबत अद्याप कोणतेही अधिकृत आदेश अथवा सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत, अशी माहिती प्रशासन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.**




तथापि, अलीकडील काही दिवसांपासून बनावट जाहिराती, खोटे भरती संदेश, सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या पोस्ट तसेच मोबाईल संदेशांच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक व वैयक्तिक माहितीची फसवणूक करण्याचा प्रयत्न होत असल्याच्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्रशासन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये नोकरीच्या आमिषाने अर्जदारांकडून शुल्क मागविणे, बनावट संकेतस्थळांची लिंक पाठविणे किंवा खोटी कागदपत्रे सादर करण्यास सांगणे अशा प्रकारे फसवणुकीचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यंत सतर्क राहून कोणत्याही अप्रमाणित, संशयास्पद किंवा अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये, तसेच अशा संदेशांना प्रतिसाद देण्यापूर्वी त्यांची खातरजमा करावी, असे आवाहन महापालिकेच्या प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिकेच्या भरती प्रक्रियेबाबतची सर्व अधिकृत, अचूक व अद्ययावत माहिती ही केवळ महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. भरतीसंदर्भातील जाहिरात, अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष, परीक्षा वेळापत्रक किंवा इतर कोणतीही सूचना यासाठी नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमांवर अवलंबून राहू नये. सोशल मीडिया, व्हॉट्सॲप फॉरवर्ड, टेलिग्राम गट किंवा इतर खासगी संकेतस्थळांद्वारे प्रसारित होणारी माहिती भ्रामक असू शकते, याची नोंद घ्यावी. त्यामुळे कोणतीही रक्कम भरताना किंवा वैयक्तिक कागदपत्रे सादर करताना काळजी घ्यावी आणि प्रथम अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन संबंधित माहितीस खातरजमा करावी, असे स्पष्ट आणि ठाम आवाहन प्रशासन विभागाचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व कोडिंग कौशल्यांची चमक; उद्योगतज्ज्ञांकडून मार्गदर्शन व कौतुक...

## एमआयटी कॉलेजमध्ये तंत्रज्ञान-सर्जनशीलतेचा संगम; स्पर्धेला मोठा प्रतिसाद

**महाईन्यूज । आळंदी**

**MIT ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE येथील स्टुडन्ट अफेअर्स अंतर्गत कार्यरत अफ्लाटस क्लबच्या वतीने "कोड अँड क्रिएट" या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विविध शैक्षणिक शाखांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली तांत्रिक कौशल्ये, सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्ण विचारसरणीचे प्रभावी प्रदर्शन केले.**



स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कोडिंग कौशल्ये, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सर्जनशील विकासाला चालना देणे हा होता. सहभागी विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण उपाययोजना आणि कल्पक प्रकल्प सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून भक्कम तांत्रिक ज्ञानाबरोबरच उत्कृष्ट टीमवर्कची झलक पाहायला मिळाली.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून महाविद्यालयाचे प्रतिष्ठित माजी विद्यार्थी व सिटीयस्टेकचे तांत्रिक प्रमुख श्री. सूरज राजू काकडे तसेच कॅपजेमिनीचे सल्लागार श्री. शानवाज मन्सुरी उपस्थित होते. त्यांनी नवोपक्रम, तांत्रिक अचूकता, सर्जनशीलता आणि सादरीकरण कौशल्यांच्या आधारे स्पर्धकांचे मूल्यमापन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून भविष्यातील करिअरसाठी उपयुक्त उद्योग अनुभव आणि मार्गदर्शनही दिले.

कार्यक्रम संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी व डॉ. मानसी अतितकर, डॉ. सुनील महाजन (डीन, स्टुडन्ट अफेअर्स) तसेच प्रा. रश्मी लाड (डीन, स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड ॲप्लिकेशन) यांच्या सन्माननीय उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. मान्यवरांनी या स्पर्धेचे कौतुक करत विद्यार्थ्यांना अशा कौशल्याधारित उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

अफ्लाटस क्लबच्या समन्वयक सहाय्यक प्रा. कविता शिंदे यांनी त्यांच्या टीम सदस्य श्रीमती अनुपमा अलगणवार, डॉ. कविता महाजन, श्री. ऋषिकेश चिकणे आणि श्रीमती शितल शेवकरी यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व समन्वय साधला. बक्षीस वितरण व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. 'कोड अँड क्रिएट' ही स्पर्धा महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सह-अभ्यासक्रम उपक्रमांमध्ये आणखी एक यशस्वी टप्पा ठरली.

> "आजच्या स्पर्धांमधील अनुभव विद्यार्थ्यांना फक्त तांत्रिक ज्ञान नव्हे तर नवोपक्रमशील विचारसरणी आणि टीमवर्कसारख्या महत्वाच्या गुणांची जाणीव करून देतो. अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे त्यांच्यासाठी भविष्यातील करिअरसाठी एक ठोस पाया निर्माण करतो.
> - **डॉ. बी. बी. वाफारे, संचालक.**

# राज्यस्तरीय मूल्यांकन प्रक्रियेत प्रतिभा ज्युनिअर कॉलेजला 'अ प्लस +' श्रेणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या वतीने नियुक्त तज्ज्ञ समितीमार्फत (२०२४-२०२५) राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे काटेकोर मूल्यमापन करण्यात आले. या प्रक्रियेत संपूर्ण महाराष्ट्रातून १,०२,६७५ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी केवळ ४२९ संस्थांना 'अ प्लस +' श्रेणी बहाल करण्यात आली आहे.**




या गौरवशाली यादीत चिंचवड येथील प्रतिभा ज्युनिअर कॉलेजचा समावेश झाला असून, पिंपरी-चिंचवड शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांपैकी 'अ प्लस +' श्रेणी मिळवणारे हे एकमेव स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालय ठरले आहे. राज्यस्तरीय 'शाळा गुणवत्ता व मूल्यांकन व आश्वासक आराखडा' प्रक्रियेत महाविद्यालयाने ही उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासनिक कार्यक्षमता, विद्यार्थी प्रगती, नवोपक्रम, पायाभूत सुविधा, शिक्षकांची गुणवत्ता आणि सामाजिक जबाबदारी अशा विविध निकषांवर संस्थांचे मूल्यमापन करण्यात आले. या सर्व निकषांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिभा ज्युनिअर कॉलेजने शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे.

ही कामगिरी केवळ संस्थेसाठीच नव्हे, तर संपूर्ण चिंचवड परिसरासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी ठरली आहे. या यशामागे प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा प्रतिभा शहा, संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांचे मार्गदर्शन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समर्पित कार्य, विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण प्रगती तसेच पालकांचा सक्रिय सहभाग यांचा मोलाचा वाटा आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि मूल्याधिष्ठित शिक्षणपद्धती यामुळे महाविद्यालयाने राज्यपातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशाबद्दल प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे सचिव डॉ. दीपक शहा, संचालक डॉ. तेजल शहा व खजिनदार डॉ. भूपाली शहा यांनी प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "ही घवघवीत कामगिरी भविष्यातील शैक्षणिक प्रगतीसाठी भक्कम पायाभरणी ठरेल. येणाऱ्या काळातही प्रतिभा ज्युनिअर कॉलेज शैक्षणिक उत्कृष्टतेचा आदर्श निर्माण करेल," असा विश्वास संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी व्यक्त केला.

> "अ प्लस +' ही केवळ श्रेणी नसून आमच्या सातत्यपूर्ण गुणवत्तावर्धन, शैक्षणिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित शिक्षणपद्धतीची राज्यस्तरीय पावती आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि सक्षम शिक्षकवर्गाच्या बळावर आम्ही उत्कृष्टतेची ही परंपरा अधिक बळकट करू. भविष्यातही प्रतिभा ज्युनिअर कॉलेज राज्यात आदर्श शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाईल, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
> - **डॉ. दीपक शहा, सचिव, प्रतिभा ज्युनिअर कॉलेज.**

# अवैध गुटखा विक्रीची विधानसभेत 'पोलखोल'

## आमदार शंकर जगताप यांच्या तारांकित प्रश्नानंतर धक्कादायक माहिती उघड

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**राज्यात गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूवर कडक कायदेशीर बंदी असतानाही छुप्या मार्गाने विक्री आणि उत्पादन जोरात सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नामुळे समोर आले आहे. गेल्या पाच वर्षांत पोलीस प्रशासनाने १३ हजार ७८३ गुन्हे दाखल करत तब्बल १८ हजार ५०१ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. एकट्या २०२५ या वर्षात तब्बल २३९ कोटी १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**



राज्यात २० जुलै २०१२ पासून दरवर्षी गुटखाबंदीचे आदेश नूतनीकरण केले जातात. सध्याच्या अधिसूचनेनुसार, राज्यात गुटखा उत्पादन, साठा, वितरण आणि वाहतुकीवर पूर्णतः बंदी आहे. मात्र तरीही मुंबई, ठाणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात अवैधरीत्या गुटख्याचे उत्पादन व विक्री सुरू असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान, या अवैध व्यवसायाचे जाळे इतर अनेक शहरांमध्येही वेगाने पसरत असल्याची बाब समोर येत आहे. याचा धागा जोडत आमदार जगताप यांनी तारांकित प्रश्नांच्या (क्रमांक २३१२७) माध्यमातून गुटखाबंदीच्या अंमलबजावणीतील ढिसाळपणा शासनाच्या निदर्शनास आणून दिला. गुटखाबंदी संदर्भात राज्य शासनाकडून नेमक्या कोणत्या ठोस आणि प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत, याची विचारणाही त्यांनी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या पाच वर्षांतील पोलीस कारवाईची सविस्तर सांख्यिकी सादर केली. अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार दोषींवर कठोर कारवाई सुरू असून भविष्यातही या कारवाईत सातत्य राखले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. तसेच संबंधित यंत्रणांना अधिक दक्ष राहण्याच्या आणि संयुक्त मोहिमा राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



### पाच वर्षांतील कारवाईचा 'ग्राफ'

वर्ष, दाखल गुन्हे, उघड गुन्हे, अटक आरोपी
२०२१, "२,६९७", "२,६९४", "३,९३४"
२०२२," २,३८७", "२,३७८", "३,३३२"
२०२३, "३,४७७", "३,४६९", "४,३९४"
२०२४," २,७८४", "२,७७७", "३,६६८"
२०२५ ,"२,४३८", "२,४१४", "३,१७३"
एकूण, "१३,७८०", "१३,७३२", "१८,५०१"

"राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी गुटखाबंदीची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. यासाठी मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागांच्या माध्यमातून केले जाणारे प्रयत्न दिलासादायक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या उत्तरातून स्पष्ट होत आहे . मात्र केवळ कागदोपत्री आकडेवारी न दाखवता, प्रत्यक्ष गुटखा विक्री शून्यावर आणण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली पाहिजेत, यासाठी माझा पाठपुरावा सुरूच राहील."

- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

---

# आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यातून 'शाश्वत व पारदर्शक' पिंपरी-चिंचवड संकल्प

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**आमदार अमित गोरखे आणि महाराष्ट्रातील १५ आमदारांनी १७ ते २१ फेब्रुवारी दरम्यान लंडन व वेल्स येथे पाच दिवसांचा आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण केला. 'युनिव्हर्सिटी ऑफ वेल्स ट्रिनिटी सेंट डेव्हिड' आयोजित या अभ्यासक्रमात जागतिक नेतृत्व, शाश्वत कृषी व्यवस्थापन, पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती आणि संसदीय लोकशाही प्रक्रियेचा सखोल अभ्यास करण्यात आला.**



### डेटा-आधारित प्रशासन

प्रत्येक योजनेचा खर्च-लाभ विश्लेषण, डिजिटल मॉनिटरिंग आणि KPIS यांमुळे प्रशासन अधिक पारदर्शक आणि परिणामाभिमुख बनेल. सर्क्युलर वॉटर इकॉनॉमी आणि रिसायकलिंग तंत्रज्ञानाचा अनुभव घेऊन शून्य-कार्बन तंत्रज्ञान, सौरऊर्जा प्रकल्प आणि ई-वाहन चार्जिंग नेटवर्क राबवले जातील. युवा नेतृत्वास प्रोत्साहन, वंचित घटकांसाठी कौशल्य विकास आणि संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी प्रशासनाला लोककेंद्रित आणि समतेवर आधारित बनवेल.

दौऱ्यादरम्यान आमदार गोरखे यांनी वेल्समधील अत्याधुनिक कचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, पुनर्वापर तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा सविस्तर अभ्यास केला. स्थानिक प्रशासन डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कशाप्रकारे कचरा संकलन, वर्गीकरण आणि विल्हेवाट प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवते, याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच स्मार्ट सेन्सर, डेटा ॲनालिटिक्स आणि रिअल-टाइम मॉनिटरिंगच्या माध्यमातून सेवा वितरण अधिक परिणामकारक कसे केले जाते, याची माहिती त्यांनी घेतली. वेळेच्या काटेकोर नियोजनाची शिस्त, जबाबदाऱ्यांचे स्पष्ट विभाजन आणि नागरिकांशी सातत्यपूर्ण संवाद या घटकांमुळे प्रशासन अधिक कार्यक्षम कसे बनते, यावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले.

लंडनमधील संसदीय प्रक्रिया, विधिमंडळातील चर्चेची पद्धत, कायदे निर्मितीची टप्प्याटप्प्याने होणारी अंमलबजावणी तसेच युवा नेतृत्वाला दिले जाणारे व्यासपीठ यांचाही त्यांनी सखोल अभ्यास केला. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वय, धोरणनिर्मितीत तज्ज्ञांचा सहभाग आणि सार्वजनिक धोरणांमध्ये पारदर्शकतेची अंमलबजावणी या बाबींचा त्यांनी अनुभव घेतला. या सर्व अनुभवांच्या आधारे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत कार्यक्षमता मोजण्यासाठी आधुनिक 'परफॉर्मन्स डॅशबोर्ड' प्रणाली विकसित करणे, विभागनिहाय केपीआय (KPIS) निश्चित करून त्यावर नियमित पुनरावलोकन करणे आणि नागरिकांसाठी खुली, पारदर्शक व सुलभ माहिती प्रणाली उभारणे, असा संकल्प त्यांनी व्यक्त केला. यामुळे प्रशासनातील उत्तरदायित्व वाढेल आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पर्यावरणपूरक व शाश्वत विकासाच्या दृष्टीने सौरऊर्जा प्रकल्पांची व्यापक उभारणी, शासकीय इमारतींमध्ये अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणे, शहरभर ई-वाहन चार्जिंग नेटवर्कचा विस्तार, हरित परिवहनाला प्रोत्साहन, तसेच झिरो-कार्बन तंत्रज्ञानाचा टप्प्याटप्प्याने अवलंब करण्याची महत्त्वाकांक्षी योजना त्यांनी जाहीर केली.

"धोरणे जाहीर करणे पुरेसे नाही; ती नागरिकांपर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचली पाहिजेत. पारदर्शकता, शिस्त आणि समाजसन्मुख धोरण हेच आधुनिक प्रशासनाची खरी ओळख आहेत." शासन व्यवस्थेत केवळ धोरणे जाहीर करणे पुरेसे नाही, तर त्या धोरणांचे प्रत्यक्ष परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत. इम्पॅक्ट असेसमेंट, डिजिटल मॉनिटरिंग व उत्तरदायित्व हीच आधुनिक प्रशासनाची खरी ओळख आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक शहरात डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया आणि कार्यक्षम अंमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे.

– अमित गोरखे, आमदार, विधान परिषद.

# Pratibha Junior College Awarded 'A Plus +' Grade in State-Level Evaluation Process

**MAHAENEWS I PUNE**

**A rigorous evaluation of schools and junior colleges across Maharashtra was conducted for the academic year 2024–2025 by an expert committee appointed by the Maharashtra State Council of Educational Research and Training. In this comprehensive process, 102,675 schools and junior colleges from across the state were assessed, out of which only 429 institutions were awarded the prestigious 'A Plus +' grade.**



> 'A Plus +' is not merely a grade, but a state-level recognition of our continuous quality enhancement, academic commitment, and value-based education system. With a focus on holistic student development, effective integration of modern technology, and the strength of a capable teaching faculty, we will further reinforce this tradition of excellence. We remain committed to establishing Pratibha Junior College as a model institution of academic excellence in the state.
>
> - Dr. Deepak Shah, Secretary, Pratibha Junior College.

Among this distinguished list is Pratibha Junior College, located in Chinchwad, which has emerged as the only self-financed junior college in Pimpri–Chinchwad city to secure the 'A Plus +' grade. The college achieved this remarkable milestone under the state-level School Quality Assessment and Assurance Framework.

Institutions were evaluated on multiple parameters including academic excellence, administrative efficiency, student progress, innovation, infrastructure, teacher quality, and social responsibility. Excelling across all these criteria, Pratibha Junior College has set a new benchmark in educational quality.

This achievement is not only a matter of pride for the institution but also for the entire Chinchwad locality. The success is attributed to the visionary leadership of Chairperson Mrs. Pratibha Shah, Founder Secretary Dr. Deepak Shah, the guidance of Principal Dr. Vanita Kurhade, the dedicated efforts of teaching and non-teaching staff, the consistent academic performance of students, and the active involvement of parents. With its commitment to quality education, disciplined management, effective use of modern technology, and value-based learning practices, the college has established a distinct identity at the state level. On this occasion, Secretary Dr. Deepak Shah, Director Dr. Tejal Shah, and Treasurer Dr. Bhupali Shah felicitated Principal Dr. Vanita Kurhade, department heads, faculty members, and staff with bouquets and extended their best wishes for continued success. "This remarkable achievement will serve as a strong foundation for future academic progress. In the years to come, Pratibha Junior College will continue to set an example of educational excellence," expressed Founder Secretary Dr. Deepak Shah.

# D Y Patil College of Engineering Crowned Champions at SSPU Men's Volleyball Tournament

**MAHAENEWS I PUNE**

**IN A MOMENT OF IMMENSE PRIDE AND CELEBRATION, THE VOLLEYBALL BOYS TEAM OF D Y PATIL COLLEGE OF ENGINEERING EMERGED AS THE CHAMPIONS AT THE PRESTIGIOUS SSPU (MEN'S) VOLLEYBALL TOURNAMENT, HOSTED AT SYMBIOSIS SKILLS AND PROFESSIONAL UNIVERSITY.**



Displaying exceptional athleticism, strategic gameplay, and remarkable teamwork, the team delivered consistently outstanding performances throughout the tournament. Their determination, discipline, and fighting spirit on the court led them to a well-deserved and glorious victory. The management and administration of the college extended heartfelt congratulations to the players for bringing laurels to the institution. Trustee Mr. Tejash Patil appreciated the team's unwavering dedication and applauded their hard work. Campus Director Radm (Retd) Amit Vikram praised the players for their discipline, focus, and competitive spirit. Principal Dr. P. Malathi congratulated the champions and encouraged them to continue striving for excellence in future tournaments. Dean Administration Dr. S. S. Sarnobat and Dean Affairs Dr. Smita Pataskar expressed immense pride in the team's remarkable accomplishment. Director of Physical Education Mr. Abaji S. Mane highlighted that this achievement is a reflection of consistent training, strong teamwork, and steadfast commitment. This triumph stands as a testament to the college's commitment to nurturing sports excellence alongside academic achievement. The entire college fraternity celebrates this glorious victory and wishes the team continued success in upcoming competitions.